# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २२३ वा ❑ मंगळवार दि.२८ ऑक्टोबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## रीलचा प्राणघातक खेळ

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

३० सेकंदांच्या छोट्या व्हिडिओंना शॉर्ट्स म्हणतात. तथापि, काही व्हिडिओ २ मिनिटांपर्यंतचे असतात. रील्स हा देखील एक प्रकारचा लघु व्हिडिओ आहे. रील्स बनवण्याची क्रेझ टिकटॉक ॲपपासून सुरू झाली. भारतात टिकटॉकवर बंदी घालताच लोकांनी फेसबुक आणि इंस्टाग्रामवर सर्व प्रकारचे रील्स अपलोड करण्यास सुरुवात केली. मजेदार, माहितीपूर्ण, भावनिक, सर्व प्रकारचे व्हिडिओ रील्सवर मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. म्हणूनच लोक त्याचे व्यसन करत आहेत. सेलिब्रिटींपासून ते सामान्य लोकांपर्यंत सर्वजण या रील्स बनवत आहेत, परंतु मुलांमध्ये आणि तरुणांमध्ये त्याची जास्त क्रेझ दिसून येत आहे. फ सबुक आणि इंस्टाग्रामवर अपलोड करण्यासाठी काही जण जीवाची पर्वा न करता वाटेल त्या प्रकारचे रील्स बनवत आहे. तरुण लोक रीलसाठी आपला जीव धोक्यात घालत आहेत. मध्यप्रदेश मध्ये एका तरुणाने तोंडात फटाके फोटून स्वतःचा जबडा भाजून घेतला.त्याची प्रकृती गंभीर आहे.

काही जन तर बाईक वर स्टंट करतात,तर काही चक्क धावत्या ट्रेन समोरून धावतात.तर काही वाहत्या पाण्यात उतरुन रील बनवतातआणि आपला जीव धोक्यात घालतात.

बलरामपूर जिल्ह्यातील राजपूर पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या बरीयों पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अखोरा खुर्द (जवाखड) गावात

बलरामपूरमध्ये इंस्टाग्राम रील्सबाबत एक दुःखद घटना घडली. पत्नीच्या रील्स बनवण्याच्या सवयीला कंटाळून पतीने घराची वीज तोडली. वाद वाढत असताना, पत्नीने त्याला चाकूने धमकावले, ज्यामुळे हाणामारी झाली आणि तिचा मृत्यू झाला. पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे. कौटुंबिक वादात महिलेला आपला जीव गमवावा लागला.

मध्यप्रदेश मधील मंडीमध्ये बाईक स्टंट करताना एका २२ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. तो सोशल मीडियावर रील्स तयार करण्याचा त्याला छंद होता. मध्य प्रदेशातील झाबुआ जिल्ह्यात, तरएका तरुणाने रील बनवण्याच्या छंदामुळे आपला जीव धोक्यात घातला. तोंडात फटाके फोडल्यानंतर त्याने आपला जबडा आणि चेहरा उडवून दिला. त्याला उपचारासाठी रतलामलाही पाठवण्यात आले.

झाबुआ जिल्ह्यातील पेटलावड पोलिस स्टेशन हद्दीतील बाछेखेडा गावात बुधवारी संध्याकाळी एक तरुण तोंडात फटाके फोडत होता. त्याने एकामागून एक सात बॉम्ब फोडले. आठवा बॉम्ब फोडण्याचा प्रयत्न करताना त्याने चूक केली आणि त्याचा जबडा मोठ्या स्फोटाने उडून गेला. या अपघातात रोहितचा चेहरा गंभीर जखमी झाला आणि तो भाजला गेला. स्वतःला हिरो सिद्ध करण्यासाठी, १८ वर्षीय रोहित गावातील काही मुलांसमोर वारंवार तोंडात फटाके फोडत होता.

अपघातानंतर लोकांनी त्याला पेटलावड रुग्णालयात नेले. त्याची गंभीर प्रकृती पाहून डॉक्टरांनी त्याला रतलाम जिल्हा रुग्णालयात रेफर केले. प्रत्यक्षदर्शींच्या मते, रोहित बॉम्ब फोडतच राहिला. असे म्हटले जात आहे की तो सोशल मीडिया ट्रेंड फॉलो करण्याचा प्रयत्न करत होता. या घटनेमुळे गावात घबराट निर्माण झाली. अपघात झाला तेव्हा काही लोक घटनास्थळी या घटनेचे चित्रीकरण करत होते.

पेटलावड रुग्णालयाचे बीएमओ डॉ. एमएल चोप्रा यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, तरुणाचा जबडा पूर्णपणे खराब झाला होता आणि त्याच्या चेहऱ्यावर खोल जखमा होत्या. तरुणाला गंभीर दुखापत झाली होती आणि प्राथमिक उपचारानंतर त्याला रतलाम येथे रेफर करण्यात आले होते. सारंगी चौकीचे प्रमुख दीपक देवरे यांनी ही घटना तरुणाच्या निष्काळजीपणाचे परिणाम असल्याचे वर्णन केले. त्यांनी तरुणांना सोशल मीडियावर दाखवण्यासाठी असे धोकादायक पाऊल उचलू नये असे आवाहन केले.

या प्राणघातक अपघातामुळे पुन्हा एकदा तरुणांनी सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्यासाठी आपला जीव धोक्यात घालण्याच्या धोकादायक प्रवृत्तीकडे लक्ष वेधले आहे. तरुणांमध्ये व्हायरल कंटेंट तयार करण्याच्या वाढत्या वेडाबद्दल मानसोपचारतज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

# शब्दांच्या तेजाने उजळलेली एक दिवा कवितेचा मैफल!









ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – दिवाळी म्हणजे दिव्यांचा, आनंदाचा आणि उत्साहाचा सण. या सणाचे खास वैशिष्ट्य म्हणजे दिवाळी पहाट, जिथे संगीताच्या सूरमयी आणि साहित्याच्या अवीट मैफलीने पहाटेचा उत्साह द्विगुणित होतो, हीच परंपरा कायम ठेवत, ध्यास गझल, टेरेसवरील कविता समूह आणि ट्रान्स डेल्टा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवा कवितेचा ही कविता, गझलांची बहारदार मैफल दिनांक २२ ऑक्टोबर २०२५ रोजी शहरात मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

निमंत्रित कवींच्या हस्ते दिवा लावून मैफलीचा मंगलमय शुभारंभ सकाळच्या प्रसन्न वातावरणात सकाळी ६:३० वाजता मृद गंधकला दालन ११, वसंतराव नाईक चौक, सिडको येथे झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कवी, अभ्यासक प्रा.श्रीधर नांदेडकर यांनी मार्गदर्शन केले, तर या साहित्य सोहळ्याचे उद्घाटन ॲड. महेश भोसले यांच्या हस्ते झाले..

दीप प्रज्वलन, प्रतिमापूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. मैफलीच्या शीर्षकाचे आणि कवींनी जमा केलेल्या निधीतून विकत घेतलेल्या ध्वनी व्यवस्थेचे (साउंड सिस्टीम चे) मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण झाले. प्रास्ताविक गिरीश जोशी यांनी तर आभार प्रशांत नानकर ह्यांनी व्यक्त केले.

गझलकार राज रणधीर ह्यांनी, अंधाराला गुरू मानले जाते इतक्यासाठी सूर्य लपविला जातो. ही गझल सादर करून मैफलीची बहारदार सुरुवात केली.युवा कवी अविनाश काठवटे याने लिहिण्याचे सामर्थ्य नको पण दान एवढे दे भगवंता, लिहिलेले वाचत असतांना लिहिर्णाय़ाची व्यथा कळावी! ही कविता सादर केली. प्रा. विजय पोहनेरकर ह्यांनी, दोस्त म्हणाला काय करावं काहीच कळत नाही, कितीही सांगा बायको अजिबात ऐकत नाही, ही विनोदी कविता सादर करून मैफलीत हास्य रंगाची उधळण केली. कवी शैलेश देशपांडे ह्यांनी पांडुरंगा एवढेसे दान दे आता, भूक तू देतोस तेव्हा भाकरीही दे. ही कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कवयित्री मृणाल देशपांडे ह्यांनी सादर केलेली, ललाटी चंदन लावलं तरीही येत नाही बघ आमच्या मस्तकात शीतलता ही कविता उपस्थितांना भावली. कवी सुनील उबाळे ह्यांनी माणसाची आदळ असणाऱ्या ठिकाणी सापं फिरकत नाहीत, सापांची वारुळे नष्ट करून माणसं राहू लागलीत, कदाचित हेही एक कारण असेल माणसं विषारी बनण्यामागे, ह्यांसोबत भाकर, शाळा, माणूस इत्यादी आशयघन कविता सादर करून रसिकांची मने जिंकली. रवी कोरडे ह्यांनी मी विस्थापित केलंय.. ही मुक्त छंदातली कविता खास शैलीत सादर केली.

कवयित्री संध्या फुलपगार ह्यांनी, मी का बरं कुणाची चाकरी करावी म्हणते, अर्धीच पण,हक्काची भाकरी करावी म्हणते. ही कविता सादर केली. सहभागी कवींनी आपल्या कविता व गझलांच्या माध्यमातून रसिकांच्या मनाचा ताबा घेतला. मान्यवर कवींनी सामाजिक विषयांवर, मानवी भावनांवर आणि माणुसकीवर आधारीत, तेजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रेरणादायी, प्रासादिक रचना सादर केल्या. रसिकांनी कविता, गझलांना मनमुराद दाद दिली. कवींच्या दमदार सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. उपस्थित श्रोत्यांना दिवाळी पहाटच्या मंगलमय वातावरणात शब्दांचा अद्भुत अनुभव मिळाला. एक दिवा कवितेचा या नावाला साजेशी अशी ही मैफल होती.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात श्री गिरीश जोशी आणि श्री प्रशांत नानकर (निमंत्रक) यांचा मोलाचा वाटा होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती दिपाली कुलकर्णी, शैलेश देशपांडे ह्यांनी केले. कार्यक्रमास शताब्दी काव्य मंडळ यांचे सहकार्य लाभले. प्रवेश सर्वांसाठी मोफत ठेवल्यामुळे, शहरातील काव्य प्रेमींनी या मैफलीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, ज्यामुळे ही दिवाळी पहाट खऱ्या अर्थाने अविस्मरणीय ठरली. दिवाळी पाडवा या मंगल पर्वावर, एक दिवा कवितेचा या उपक्रमाने साहित्य आणि संस्कृतीच्या परंपरेला अधिक समृद्ध केले आणि कवी व रसिकांमध्ये एक अनोखा स्नेहबंध निर्माण केला. कार्यक्रमाला साहित्य क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती लाभली.



# स्वरामृत दिवाळी पहाटला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – दिवाळीच्या मंगल वातावरणात उन्नती सोशल फाउंडेशन आणि शत्रुघ्न (बापु) काटे युथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ''स्वरामृत दिवाळी पहाट'' या भव्य सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेला हा कार्यक्रम १८ आणि १९ ऑक्टोबर २०२५ रोजी पहाटे ६ वाजता तसेच संध्याकाळी ६ वाजता पिंपळे सौदागर येथील शिव छत्रपती शिवाजी महाराज लिनिअर अर्बन गार्डन, गोविंद यशदा चौक येथे संपन्न झाला.

चिंचवड विधानसभेचे आ. शंकर जगताप यांची प्रमुख उपस्थिती या स्वरामृत दिवाळी पहाटला होती.

दोन दिवसांच्या सुरेल पर्वात लोकप्रिय कलाकारांनी आपली कला सादर केली. त्यामध्ये सारेगमप फेम महेश कंटे, सुरमणी भाग्यश्री देशपांडे, सुप्रसिद्ध पार्श्वगायक रवींद्र खोमणे, गायिका आनंदी जोशी, झी सारेगमप विजेत्या अंजली गायकवाड, नंदिनी गायकवाड या गायकांनी आपल्या सुरेल आवाजाने पिंपळे सौदागर वासीयांना मंत्रमुग्ध केले.

स्वरामृत दिवाळी पहाट च्या आयोजनामागील संकल्पना विशद करताना पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे म्हणाले, ''उन्नती सोशल फाउंडेशन आणि आमच्या युथ फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही केवळ समाजकारणच नव्हे, तर संस्कृतीकारणालाही चालना देण्याचा प्रयत्न करीत आहोत. या कार्यक्रमाच्या आणखी एक आयोजिका आणि उन्नती सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ.सौ. कुंदाताई संजय भिसे म्हणाल्या, ''दिवाळी म्हणजे प्रकाश, आनंद आणि ऐक्याचा उत्सव. या निमित्ताने समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून संगीताच्या माध्यमातून आनंद वाटण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत.

चिंचवड विधानसभेचे आ. शंकर जगताप यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, ''संस्कृती आणि समाजकारण यांचा संगम घडवणारे असे उपक्रम शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देतात.

स्वरमृत दिवाळी पहाटच्या दोन्ही दिवशी पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरातील संगीत प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वास्तुशास्त्र पेंटिंग

### लघुलेख- ७७



राशीचक्रातील दुसरी रास, "वृषभ" आहे. या राशीचे चिन्ह "बैल" आहे. या राशीवर शुक्र ग्रहाचे वर्चस्व आहे. या राशीच्या लोकांना खूप कष्ट करावे लागतात. मेहनत आणि परिश्रम हे दोन घटक म्हणजे "वृषभ रास"...असं जणु समिकरणच असतं. खूप कष्ट करणारी व्यक्ती वृत्तीने स्थिर आणि व्यवहारी असते. परंतु अगदीच शांत असणारी व्यक्ती जेव्हा रागावते तेव्हा ती लवकर शांत ही होत नसते. वृषभ व्यक्ती बऱ्याचदा या स्वभावाच्या असतात.

अशा या राशीच्या जातकांसाठी "वास्तुशास्त्र पेंटींग" म्हणजे पाण्यावर तरंगणा-या होडीच्या सुकाणु' प्रमाणे ठरते. हवेच्या कलाने कधीतरी होडी पैलतीरी पोहोचतेच परंतु "सुकाणु" चा वापर योग्यरितीने केल्यास ती होडी वेळेत पैलतीरी पोहोचते. त्या "सुकाणु" चं कार्य "वास्तुशास्त्र पेंटींग" करतं. हे या जातकांनी ध्यानात घ्यावयास हवं. त्यामुळे कोणत्या गोष्टी मध्ये यांना गती मिळु शकते? तर या व्यक्तींना कामाच्या ठिकाणी सहकार्याकडून अपेक्षित सहकार्य मिळते, आपल्या मेहनतीला योग्य ठिकाणी न्याय मिळून आपल्या कार्यक्षेत्रात यशाची कवाडे नियोजित वेळेच्या अगोदरच खुलतात आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आपली मेहनत-कष्ट-परिश्रम-सोशिकता आणि दृढता वाया जात नाही.

'बैल' अर्थात 'नंदी' हे प्रतिकं या राशीचं आहे. 'बैल' हे चिन्ह देण्यामागचं कारणही तितकंच समर्पक आहे 'बैल' हे शक्ती-संयम आणि कणखरपणाचे प्रतिक आहे. बैल स्वभावत: शांत आणि परिश्रमी असतो. बैल, जर उधळला म्हणजे, त्याला जर राग आला तर मात्र तो फारच उग्र रूप धारण करतो. या राशीचे गुण आणि बैलाचे गुण यांत बरेच साम्य असल्याने वृषभ राशीला 'बैलाचे' चिन्ह दिले असावे.

'बैल' अर्थात 'नंदी', हा शिवाचं वाहन आहे. हा ही विचार आपण 'वास्तुशास्त्र पेंटींग' मध्ये करतो. बैलाला शेतकरी शेतीचा 'कणा' मानतात. त्याच्यावर अपेक्षांचे खूप मोठे ओझे असते. वृषभ राशीच्या व्यक्तीवर ही खूप अपेक्षांचा बोजा असतो. प्रमाणिकपणा आणि कष्टाळू वृत्तीमुळे त्यांच्या कष्टाचा, मेहनतीचा केवळ लाभ उठवला जातो. असा त्यांच्यातील बऱ्याच जातकांचा अनुभव आहे. म्हणून "वास्तुशास्त्र पेंटींग" त्यांच्या कष्टाला आणि मेहनतीला यशाच्या शिखरावर बसवते...! क्रमश:.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



# जात्यावरच्या ओव्या......

---

लेकीला दिल लांब
आता भेटीची आसं
नाही घशाखाली सरकत
गोडाधोडाचा घास ||२६५||

पहाटेच्या पारी
सडा सारवण
देवाजीचा रथ
गेला नगरावरुन ||२६६||

---

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# सोडा रेडी टू इट, खा घरचेच नीट

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

हे पाकिटबंद पदार्थांचे आणि रेडी टू ईट पदार्थांचे लोण आपल्याकडेही मोठ्या प्रमाणात पसरत चालले आहे. आज भारतातील मुंबई पुण्यासारख्या अनेक शहरांमध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रियांना वेळ नसल्यामुळे असे पदार्थ खाण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचप्रमाणे सध्या जी मॉल संस्कृती निर्माण झाली आहे ती पण काही अंशी याला कारणीभूत आहे. मॉलमध्ये जाणे आणि खरेदी करणे हे गरजेपेक्षा जास्त हौशीचे आणि प्रतिष्ठेचे लक्षण बनले आहे. मॉलमध्ये फिरत असताना आपण अशा अनेक पदार्थांची खरेदी करतो की जे आवश्यक नसतात. त्यामध्ये खाण्याच्या पाकिटबंद पदार्थांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असते. त्यात आपल्या आवडीचे अनेक पदार्थ असतात. काही तयार पदार्थ आणि काही रेडी टू कूक. जसे ढोकळे, बाकरवडी, गुलाबजाम इ. अनेक भाज्यांची पाकिटेही मिळतात. असे अनेक पदार्थ दुकानांमध्ये मिळतात. मंडळी, या पदार्थांचे शेल्फ लाईफ वाढवण्यासाठी त्यात अनेक धोकादायक रसायने, म्हणजेच प्रिझर्वेटिव्हज वापरलेले असतात. तेव्हा भरमसाठ पैसे देऊन असले पदार्थ खरेदी करून आपण आपल्या आरोग्याची हानी करून घेत असतो.



आपल्या व्याख्यानात डॉ. अविनाश सावजी असे म्हणाले की या संदर्भात गांधीजींनी सांगितलेले एक साधे सोपे सूत्र आपण लक्षात ठेवू या. गांधीजी म्हणाले होते जे पदार्थ नाशिवंत असतात किंवा लवकर नासतात, कुजतात ते पदार्थ आरोग्यास चांगले असतात. मी जेव्हा हे प्रथम ऐकले तेव्हा मला सुरुवातीला त्यांचे विधान विचित्र वाटले. की नाशिवंत पदार्थ आरोग्याला चांगले कसे असतील ? हा वरवर पाहता विरोधाभास वाटतो. पण ते खरे आहे. उदा. आपल्या घरी बनवलेली भाजी, पोळी,भाकरी लवकर खराब होते. दुसऱ्या दिवशी ते पदार्थ शिळे होतात. हे नाशिवंत पदार्थ आहेत. ते ताजे असतानाच आपण खातो आणि खाल्ले पाहिजेत. जेवढे आपण घरी बनवलेले ताजे पदार्थ खाऊ तेवढे आपले आरोग्य चांगले राहील.

शास्त्रज्ञानी आरोग्यासाठीच्या केलेल्या संशोधनात असे आढळून आले की ताजे आणि स्वच्छ पदार्थ आपल्या आरोग्यासाठी चांगले असतात. स्वच्छ म्हणजे पाकिटबंद पदार्थ नाहीत ही गोष्ट पुन्हा येथे लक्षात घेतली पाहिजे. पाकिटबंद पदार्थ जसे तेल, मीठ, साखर आपल्याला स्वच्छ दिसतात पण प्रत्यक्षात ते तयार करताना त्यात धोकादायक रसायनांचा वापर केलेला असल्याने ते आरोग्यास अपायकारक असतात. त्याऐवजी साधे मीठ, गूळ, घाण्यावर काढलेले तेल आरोग्यासाठी चांगले आहेत. तसेच घरातील फ्रिजमध्ये आपण अनेक पदार्थ साठवून ठेवतो. बऱ्याच वेळा आठवडभरासाठीच्या भाज्या आपण घेऊन ठेवतो. पण फ्रिजमध्ये ठेवल्या तरी त्यातील पोषक घटक नष्ट होतात, त्या शिळ्या होतात. म्हणून शक्यतो ताज्या भाज्या, फळे विकत घेऊन खाल्ली पाहिजेत. अशा पद्धतीचा ताजा आहार माणसाचे आरोग्य वाढविण्यास व तारुण्य टिकविण्यास मदत करतो.

तेव्हा शक्य तो घरी बनवलेले पदार्थच खाऊ या. शिवाय ते पदार्थ मोठ्या प्रेमाने आपल्या आईने, पत्नीने बनवलेले असतात त्याची सर बाहेरच्या पदार्थांना कशी येणार ?

***

## दासबोध स्तवन





उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# देवशोधन

ज्योतिर्मय साहित्य

दशक ६, समास १

नमस्कार,

श्री समर्थ दासबोधाचे सहाव्या दशकातील पहिला समास लिहिताना अत्यानंद होत आहे.

श्री समर्थ रामदास स्वामी पूर्णपणे अद्वैत वादी तत्वज्ञानी आहेत. समर्थ आपल्याला प्रत्येक समासात सांगतात की आपल्या देहासकट हे संपूर्ण विश्व सतत पालटते म्हणून ते सर्वस्वी खरे नाही. त्याच्या मागे कधी न पालटणारी व सर्वस्वीं खरी अशी एक चांगली गोष्ट आहे. ती स्वतः अचल राहून ती या चल विश्वाला आधार देते. ती ज्ञानमयी व आनंदमय आहे. म्हणून तिचा साक्षात्कार झाला की माणसाला संपूर्ण समाधान मिळते. माया ही मोठी विलक्षण शक्ति आहे. तिच्यामुळे दृष्याचा देखावा दिसतो व आपल्यातील अज्ञानामुळे जीव त्यात अडकुन बसतो. खरे पहाता स्वरूपत: मिथ्या असलेले द्रुश्य इंद्रियांना प्रत्यक्ष दिसते हे खरे आहे पण ते सर्वस्वी सत्य वाटणें हे अज्ञानाचे लक्षण आहे. स्वस्वरूपाच्या आड येणाऱ्या द्रुश्याचे जंजाळ विरळ करण्यासाठी जीवाचे अज्ञान कमी केले पाहिजे. विवेकाने द्रुश्याचा शोध घेऊ लागले म्हणजे द्रुश्य हे विनाशी तत्वांचा वरवरचा डोलारा आहे हे पटते. मग सहजपणे जीव देहाच्या अहंकाराला बाजूला सारतो आणि ऊरलेल्या निर्गुण आत्मस्वरूपाशी समरस होतो, एकरूप होतो. आणि यालाच तर तत्वज्ञान म्हणतात. ‘‘मी देह आहे‘‘ अशी भावना असते; तोपर्यंतच द्रुष्य खरे वाटते. म्हणून आत्मानात्मविवेक व सगुणोपासना या दोन चाकावर जर साधनेचा रथ नीट चालवला तर अनात्म द्रुश्याचें निरसन होत जाते. अज्ञानाचे कवाड ऊघडते व आत्मदर्शन होते. म्हणून समर्थ प्रत्येक वेळी आपल्याला विवेक जागा ठेवा व उपासना करा असे सांगतात. बुद्धीचा वापर विवेकाने करावा, उपासना श्रध्येने करावी आणि स्वतः ला सतत ओळखत रहावे.हीच तर समर्थांची शिकवण आहे. तर मित्रांनो ही शिकवण कधीही विसरू नये. **(क्रमशः)**

# || निरूपण ||



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री
सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

सुखं त्वं सुखस्यापि मातः प्रदेहि
धनं देहि भक्तिं समाधानमेव।
सदा ते स्वरूपं विलोक्याम्ब मुग्धो
भवामीति भाग्यं महन्मे च मन्ये ।।१२०।।

हे माते, तू सुखाचेही सुख आहेस. मला धन दे. भक्ती दे. समाधान दे. हे अंबे, तुझे स्वरूप पाहून मी सदैव मुग्ध होतो, हे माझे महद् भाग्य मी मानतो.

नेच्छा मम विरामस्य तथापि विरमाम्यहम्।
सलीलपूर्णनेत्राभ्यामम्बे नतोऽस्मि रेणुके।।१२१।।

हे माते, रेणुके, माझी विरामाची इच्छा नाही. तरीही अश्रूपूर्ण नेत्रांनी तुला नमस्कार करून थांबतो.

।। इति श्रीदेवीकृपया चन्द्रहासेन विरचितंश्रीरेणुकाशरणम् ।।

# सगुणभक्ति



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

सर्वांभूती भगवंत आहे याची खात्री पटायच्या आधी, तो माझ्यात आहे हे पटले पाहिजे. सोन्याचा दागिना ‘ मला सोने भेटवा ’ असे म्हणत नाही; त्याचप्रमाणे, मला भगवंत बाहेरून कुठून भेटायचा आहे असे नाही समजू. तो आपल्याजवळच आहे. मनुष्य बोलतो तसा जर वागला तर त्याला त्याची प्रचीती आल्याशिवाय राहणार नाही. मी ‘कुणाचा’ आहे हे जर जाणले तर मी ‘ कोण ’ हे कळायला वेळ लागायला नको. सत्समागम केला म्हणजे मी कोण आहे हे कळते. साक्षीरूपाने नटलेला जो ‘ मी ’, त्याला पाहायला जंगलात जायला नको. ‘ माझेपण ’ सोडावे म्हणजे ‘ मी ’ चा बोध होतो. भगवंत चोहोकडे भरलेला आहे असे आपण नुसते तोंडाने म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही हे आपले मूळ चुकते. भगवंत माझ्यात आहे तसाच तो दुसऱ्यातही आहे, हे आपण सोयिस्करपणे विसरून जातो. जसा खोलीतला दिवा प्रकाशाने सर्व खोली व्यापून टाकतो, तसे हे सर्व जग भगवंताने व्यापून टाकले आहे. मी कर्ता नसून राम कर्ता आहे हे म्हटले म्हणजे त्यात सर्व आले. पोशाख निरनिराळे केले तरी मनुष्य हा एकच असतो. संन्यास हा मनाचा असतो, पोशाखाचा नसतो. मनावर कशाचाच परिणाम होऊ न देणे हाच संन्यास.

सगुणभक्ती करावी, भक्तीने नाम घ्यावे, नामात भगवंत आहे असे जाणावे, आणि भगवंताचे होऊन राहावे, हाच परमार्थाचा सुलभ मार्ग आहे. साधुसंतांनी अतिशय परिश्रम घेऊन आणि स्वत: अनुभव घेऊन हा मार्ग आपल्याला दाखवून दिला आहे. आपले ज्याच्याशी साम्य आहे त्याच्याशी आपली मैत्री जमते. आपण देही असल्यामुळे आज आपला देवही आपल्यासारखाच, पण त्याच्याही पलीकडे असणारा असा पाहिजे. अशा प्रकारचा देव म्हणजे सगुण मूर्ती होय. लहान मुलगा एखाद्या वस्तूसाठी हट्ट करू लागला की, आपण त्याच्यापुढे त्या वस्तूसारख्या इतर, पण बाधक नसणाऱ्या वस्तू टाकतो. त्याचप्रमाणे, सगुणोपासनेचा परिणाम होतो. दृश्य वस्तूंवर आपले प्रेम आहे; जे दिसते तेच सुखाचे आहे असे आपल्याला आज वाटते; म्हणून आपणच आपल्या कल्पनेने भगवंताला सगुण बनविला आणि त्याची उपासना केली. आपली बुद्धी निश्चयात्मक होण्यात या उपासनेचा शेवट होईल. आग्रह आणि प्रेम फक्त एका भगवंताच्या ध्येयाबद्दल असावे. इतर ध्येये असावीत, पण त्यांचा आग्रह नसावा. प्रपंचामध्ये व्यवहार होत असताना भगवंतापासून जेव्हा वृत्ती हलत नाही, तेव्हा तिला ‘सहजसमाधी’ असे म्हणतात. सहजपणाने जगणे, म्हणजे सहजपणातून वेगळे न राहणे, हीच सहजसमाधी होय. ‘ राम सर्व करतो ’ आणि ‘ राम माझा दाता आहे ’ ही भावना ज्याची स्थिर झाली, त्याच्यावर भगवंताची कृपा झाली असे समजावे. त्याच्या जन्माचे सार्थक झाले हे सांगणे नकोच.

नाम घेताना स्वतःचा विसर पडणे ही सर्वोत्कृष्ट समाधी होय. नामात स्वतःला विसरण्यास शिकावे.

# शाळेची मज्जा...



अंकुश शिंगाडे,
नागपूर

## भटकंती...

ज्योतिर्मय साहित्य

समाजातील काही लोकांची परीस्थिती अशीच आहे. शिक्षणाचा गंध नसल्यानं काही मंडळींना शिक्षणाचं आजही महत्व वाटत नाही. दाखल्यासाठी वणवण भटकणे त्यांना परवडत नाही. पोटाचाच प्रश्न जिथे सुटत नाही. तिथे दाखल्याचं काय?आजही हे दाखले मिळत नसल्यानं पाडेवाल्यांच्या घरची मंडळी अशिक्षीत असतात. निव्वळ पाडेवाल्यांचीच नाही तर आजही ब-याचशा मुलांची परीस्थिती तीच आहे.

महत्वाचं म्हणजे शिक्षणासाठी दाखला अनिवार्य असावा काय ? शिक्षणाने दाखले मागावे काय? पहिल्या वर्गात प्रवेश घेतांनाही. ज्याचेजवळ असे दाखले नसतील त्यांनी काय करावे?शिकण्याची इच्छा असतांना जर असे दाखले नसतील तर... निदान या गोष्टीचा तरी शासनाने विचार करण्याची गरज आहे. मंगलाला दाखला न मिळाल्यानं मंगलानं आपल्या मुलाला शिकवलं नाही. केवळ तिनं स्वतःही भटकंती केली. मुलालाही करायला लावली. ज्या वयात मुलांना शिक्षण हवं होतं, त्या वयात भावेश आपल्या वडीलामागे पोटासाठी भटकत होता. या गावावरुन त्या गावाकडे. शिकण्याची इच्छा असूनही केवळ शासनाच्या शिक्षणासाठी दाखले हवे या धोरणामुळे. निदान दोष कोणाला द्यायचा हेही त्याला समजत नव्हते.

**चला शाळेत जाऊया?**

दि. २३/०६/२०२५ ला शाळा सुरु झाली. परंतु आज दोन दिवस झाले तरी अद्यापही काही विद्यार्थी शाळेत पोहोचले नाहीत. ते का पोहोचले नाहीत, याचं कारण अजुनही कळायला मार्ग नाही. परंतु याबाबत खोलवर विचार केल्यास काही मुलं गावाला गेली असल्याचं कळतं.

शाळेचा पहिला दिवस. या दिवशी जास्त मुलं शाळेत येत नाहीत. परंतु जी काही मुलं शाळेत येतात. त्या मुलांना शिक्षक पहिल्याच दिवशी पुस्तक वाटप करतात व शाळेचा गणवेशही देतात. त्याचा गाजावाजा आधीच होतो. कारण उन्हाळभर जी मुलं सुट्टीच्या कालावधीत घरी राहिली. ती सर्वच मुलं शाळेत यावी म्हणून. परंतु तसं होत नाही.

आज शिक्षणाचं महत्त्व वाढलं. नवीन शाळा उदयास आल्या. नवीन शाळा अर्थात कॉन्व्हेंटच्या शाळा. या शाळेनं मराठी शाळा ओस पडल्या नव्हे तर त्या शाळेवर परीणाम झाला. एवढा परिणाम झाला की शाळेचा पहिला दिवस असो की मधातील. मुलांची संख्या कमी असते. तीच संख्या कॉन्व्हेंटच्या शाळेत जास्त असते. याला जबाबदार आहे इंग्रजी शिक्षण.

इंग्रजी शिक्षण. या शिक्षणाला आज महत्व प्राप्त झालं आहे. या महत्वातूनच कॉन्व्हेंटमध्ये प्रवेश करण्याचे महत्त्व वाढलेले आहे. या महत्वातूनच आज कॉन्व्हेंटच्या शाळेत भरभरुन मुलं आहेत. तेवढी मुलं आज जि प शाळेत वा मराठी शाळेत दिसत नाहीत. याला कारण आहे इंग्रजी माध्यमाचे महत्त्व. तरीही मराठी माध्यमाच्या शाळेत एक इंग्रजी विषय शिकवला जात आहे.

**(क्रमशः)**

## संत गाडगेबाबा



- भारत आसाराम बल्हाळ
(एम.ए. मराठी-पीएच.डी. अपीयर)
रिसर्च सेंटर- बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड
मो.नं. 7588819471

ज्योतिर्मय साहित्य

# वैराग्यमूर्ती श्री संत गाडगे महाराज

रामधुनपूर्वी गाव पूर्ण।
व्हावी स्वच्छ सौंदर्यवान।
कोणाही घरी गलिच्छपण, न दिसावे।।
‘‘मायबापहो! पशु की होत पन्हैया नरका कछूना होय।
नर करणी करे तो नर का नारायण होय

हे संतांचं म्हणणं लक्षात घेऊन करणी करा आणि स्वतः नारायण बना तुम्ही हात फिरवाल तिथे लक्ष्मी उभी राहील आणि गाव भू वैकुंठ होईल हे ध्यानात ठेवा हे वाक्य आहे अनिष्ट प्रथांच्या उच्चाटनाचे जन सुधारण्याचे व दीन सेवेचे बहुविध कार्य सतत करत आलेले व-हाडचे सत्पुरुष गाडगे महाराजांची गावात स्वच्छता पावित्र्य व सौंदर्य वाढविण्याचे कार्य करून लोकांना जागृत करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता.

ज्ञानोबापासून ते गाडगेबाबांपर्यंत सर्व संतांचे म्हणणे एक देव हा देवळात नाही, दगडात नाही, माणसात आहे पण दुर्दैवाची गोष्ट माणसातला परमेश्वर लोकांना अजून दिसत नाही. कीर्तन हे गाडगे महाराजांचे खरे सामर्थ्य आपल्या व-हाडी भाषेत बोलून सर्वांना मंत्रमुक्त करून ठेवत कोणत्याही गावात त्यांनी पाऊल टाकले की पहिल्याने हातातला झाडू चालू लागेल जणू काही त्यांना सांगायचे होते हात फिरे तेथे लक्ष्मी शिरे हे सूत्र ध्यानी ठेवोनी खरे ।आपुले ग्रामची करावी गोजिरे।शहराहूनि लोकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्याकरता त्यांनी कीर्तनाचा मार्ग अवलंबविला स्वच्छता झाल्याने काय होईल हे सांगण्याकरता अभंगाची योग्य ती उदाहरणे देत

सर्वांनी स्वच्छ शिस्तबद्ध व्हावे।
परस्परांशी प्रेम करावे।
तरीच गाव स्वर्ग व्हावे। सर्वतोपरी ।।

(क्रमशः)

## आरोग्य संजीवनी



# मिठाला एक्सपायरी डेट असते का? ते खराब होतं? भल्या -भल्यांना सांगता येणार नाही

ज्योतिर्मय साहित्य

मीठाशिवाय कोणत्याही खाद्यपदार्थाला चव येऊ शकत नाही. पण तुम्हाला हे माहिती आहे का की मीठ एक्सपायर होतं की नाही?

मीठाशिवाय कोणत्याही खाद्यपदार्थाला चव येऊ शकत नाही. तुम्ही जर एखाद्या पदार्थामध्ये मीठ टाकलंच नाही तर त्या पदार्थाची कोणतीही चव तुम्हाला लागणार नाही. तुम्ही स्वयंपाक बनवताना भाजीमध्ये कितीही मसाले वापरा, मात्र जोपर्यंत तुम्ही त्यात मीठ टाकत नाही, तोपर्यंत त्या भाजीची चव तुम्हाला लागणार नाही, किंवा ती भाजी देखील तुम्हाला खावी वाटणार नाही.मीठ हे एक प्रकाराचं खनिज आहे, जे सोडियम क्लोराइडपासून बनतं. तुम्हाला रोज घरात ज्या वस्तू आवश्यक असतात, त्यामध्ये मीठ ही सर्वात आवश्यक आणि गरजेची वस्तू आहे.

तुमच्या घरात असलेल्या विविध प्रकारच्या भाज्या, दाळ आणि इतर वस्तू एका विशिष्ट कालावधीनंतर खराब होतात. म्हणजे त्यांना एक्सपायरी डेट असते. मात्र तुम्ही कधी हा विचार केला आहे का की मीठाला देखील एक्सपायरी डेट असू शकते? कोणत्याही भाजीत मीठ टाकताना खूप काळजी घ्यावी लागते. मीठ जास्त टाकलं तर ती भाजी तुम्हाला खाता येत नाही, खारट बनते. मात्र असं अनेकदा होतं की तुम्ही जर एखाद्या भाजीमध्ये कितीही मीठ टाकलं तरीही तुम्हाला चव लागत नाही. याचा अर्थ असा होतो का की त्या मिठाची मुदत संपली आहे? मीठ एक्सपायर झालं आहे. जाणून घेऊयात या प्रश्नाचं

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

उत्तर.

मीठ एक्सपायर होतं का?

साधारणपणे मीठ हे सोडियम क्लोराइडपासून बनलेलं असतं. जे रासायनिकदृष्या स्थिर असते. याचाच अर्थ मिठावर काळाचा कोणताही प्रभाव पडत नाही. म्हणजेच मीठ कधीही एक्सपायर होत नाही. मीठामध्ये बॅक्टेरिया किंवा बुरशी देखील वाढू शकत नाही. कारणं एखाद्या पदार्थाला खराब करणारे जे बॅक्टेरिया असतात त्यांना वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असते. मात्र जे शुध्द मीठ असतं त्यामध्ये पानी नसतं त्यामुळे मीठ कधीही एक्सपायर होत नाही.

मात्र इथे एक गोष्ट लक्षात घ्या, अमेरिकेच्या कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार जे मीठ समुद्रातून मिळतं ते खराब होत नाही. मात्र तुम्ही जे घरात मीठ वापरतात त्याला वेगवेगळ्या प्रक्रियेमधून जावं लागतं. त्यामध्ये आयोडिन देखील टाकलं जातं त्यामुळे असं मीठ खराब होण्याची शक्यता असते, त्याला एक्सपायरी डेट असते. त्यामुळे एक्सपायरी डेट चेक करुनच मिठाचा वापर करावा.

****

# युगंधरा दीपोत्सव विशेषांकाचे दीपावलीच्या शुभमुहूर्तावर प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**
**छत्रपती संभाजीनगर –** संग्रामनगर येथील श्री. रेणुका माता मंदिरात श्री.रेणुका मातेच्या साक्षीने दीपावलीच्या शुभमुहुर्तावर युगंधरा दीपोत्सव विशेषांकाचे प्रकाशन प.पू. श्री.अनिरूध्द महाराज सोनईकर, प. पू.अनुरमा ताई सोनईकर,सुप्रसिध्द जेष्ठ कवी प्रा.श्री.विजय पोहनेरकर सर,.मा. श्री.अशोकराव व मा.सौ. सुमती कावसानकर,

विश्व मांगल्य छात्र सभा देवगिरी प्रांत कार्याध्यक्षा कवयित्री व लेखिका सौ.स्वाती चौधरी, सुप्रसिध्द निवेदिका/सुत्रसंचालिका कवयित्री सौ.प्रवीणा कन्नडकर, उपसंपादक डॉक्टर केदार व उपसंपादिका डॉ. अनुजा कावसानकर, उपसंपादक व कार्यकारी संपादक अथर्व कावसानकर, चैतन्य संगीत विद्यालयाच्या अध्यक्षा सौ.संपदा अतुल कावसानकर तसेच युगंधरा दीपोत्सव विशेषांकाच्या संपादिका व प्रकाशिका सौ.सुनिता दिपक कावसानकर यांच्या हस्ते पार पडले.

सर्वप्रथम प.पू.अनिरूध्द महाराज व प्राची ताई यांचा सत्कार श्री अशोकराव व सौ.सुमती कावसानकर यांच्या हस्ते श्रीफळ हार व शाल देवून करण्यात आला.. तसेच मा.जेष्ठ कवी प्रा.श्री.विजय पोहनेरकरांचा सत्कार श्री.दिपक कावसानकर यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देवून करण्यात आला.. तसेच सौ.अंजली पोहनेरकर यांचा सत्कार सौ.सुनिता कावसानकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यानंतर लगेचच प्रकाशनाचा कार्यक्रम पार पडला.. याप्रसंगी सौ. सुनिता कावसानकर यांनी प्रास्ताविक सादर केले तद्नंतर जेष्ठ कवी प्रा. श्री.विजय पोहनेरकर सर,सौ.स्वाती ठोसर- चौधरी व प.पू.अनिरुध्द महाराज यांनी आपले मनोगत व्यक्त केले..

यानंतर पुढील मान्यवरांचा सत्कार समारंभ सुनिता व डॉ.अनुजा कावसानकर यांच्या हस्ते पार पडला..सुश्री तेजसा जोशी, पूर्णकालिक प्रचारक व संघटन मंत्री, विश्वमांगल्य सभा,सौ.भारती पठाडे - अध्यक्ष, विश्वमांगल्य सभा, देवगिरी प्रांत, ममता दुसाद,संघटक,विश्व मांगल्य सभा..

युगंधरा दीपोत्सव विशेषांकातील सर्व उपस्थित लेखक/कवी/चित्रकार अनुक्रमे सौ.स्वाती ठोसर चौधरी, सौ. प्रवीणा कन्नडकर, सौ.कल्याणी भाले, सौ संपदा कावसानकर, आनंद कावसानकर व गोविंद कावसानकर या सर्वांचा प.पू.अनिरुध्द महाराज व प.पू.अनुरमा ताई यांच्या हस्ते शाल व दीपोत्सव विशेषांक भेट देवून सत्कार करण्यात आला.. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुप्रसिध्द निवेदिका सौ.प्रविणा कन्नडकर यांनी आपल्या सुंदर शैलीत केले..

या कार्यक्रमास सुश्री तेजसा जोशी, पूर्णकालिक प्रचारक व संघटन मंत्री, विश्वमांगल्य सभा, सौ.भारती पठाडे - अध्यक्ष, विश्वमांगल्य सभा, देवगिरी प्रांत, ममता दुसाद, संघटक, विश्व मांगल्य सभा, देवगिरी प्रांत

मा.श्री. सुनिल चौधरी, राष्ट्रीय विपणन व्यवस्थापक, उर्जा संवर्धन. तसेच उद्योजक मा. श्री रवी दुसाद, मा.श्री.भाले सर, मा.श्री.नंदु अदवंत मा.श्री.अतुल कावसानकर या सर्व मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. सर्व कार्यक्रम अतिशय प्रसन्न, पवित्र



व मंत्रमुग्ध करणाऱ्या वातावरणात जल्लोषात पार पडला.

# बालपण आयुष्याचं सुवर्णपान



**ज्योतिर्मय साहित्य**

बालपण हा माणसाच्या आयुष्यातील सर्वात सुंदर आणि निरागस टप्पा असतो. या काळात मन निर्मळ, चिंता विरहित आणि आनंदाने भरलेले असते. लहानपणीची प्रत्येक गोष्ट, खेळ, मित्रमैत्रीण, शाळेतील गमतीजमती हे सगळं जीवनभर लक्षात राहणारं असतं. त्या काळात छोट्या छोट्या गोष्टींमध्येही खूप आनंद मिळायचा. पावसात भिजणे, चिखलात खेळणे, फुगडी मारणे, लगोरी खेळणे या साऱ्या आठवणी आयुष्यभर मनात घर करून राहतात. बालपणात जगण्याची मजा काही औरच असते. त्या काळात ना जबाबदाऱ्या, ना ताण, ना चिंता फक्त खेळ, हसणे, रडणे आणि स्वप्नं बघणे. आईवडिलांचे प्रेम, आजीआजोबांच्या गोष्टी, आणि मित्रांसोबतचा खेळ हा त्या काळाचा अविभाज्य भाग असतो. शाळेत शिक्षकांचा धाक असला तरी त्यांच्या शिकवणीतील प्रेमामुळे अभ्यासही आनंददायी वाटतो. बालपणी केलेली चूकही निरागस वाटते, कारण त्या मागे कुठलाही स्वार्थ नसतो. त्या काळात मनात फक्त जिज्ञासा असते ''हे काय आहे?'' आणि ''असं का होतं?'' अशा प्रश्नांनीच जग रंगतं. बालपण म्हणजे शिकण्याची आणि घडण्याची सुरुवात. या काळात मिळालेलं संस्कार, शिक्षण आणि वातावरण व्यक्तिमत्त्वावर खोल परिणाम करतं. म्हणूनच म्हणतात, ''बालपणात रुजवलेले बीजच आयुष्यभर फळ देतं.'' या काळात मनावर उमटलेले अनुभव माणसाला पुढच्या आयुष्यात दिशा देतात. जेवढं निरागस बालपण, तेवढं सुसंस्कृत आणि आत्मविश्वासपूर्ण भवितव्य असतं. आजच्या यंत्रयुगात मात्र मुलांचं बालपण मोबाईल, टीव्ही आणि संगणकात अडकून पडलं आहे. अंगणात खेळण्याऐवजी स्क्रीनसमोर बसणं त्यांचं दैनंदिन जीवन झालं आहे. त्यामुळे मुलांना निसर्गाशी, मैत्रीशी आणि वास्तवाशी असलेलं नातं कमी होत चाललं आहे. शारीरिक हालचाली कमी झाल्याने आरोग्यावरही परिणाम होतो आणि बालपणाचा तो नैसर्गिक आनंद हरवतो आहे. एकूणच, बालपण हे आयुष्याचं सुवर्ण पान आहे. त्या काळातील आठवणी मनाला नेहमी हसवतात आणि जीवनातील प्रत्येक क्षणी प्रेरणा देतात. बालपण जपावं, ते जिवंत ठेवावं कारण तिथेच खरी आनंदाची सुरुवात असते. ज्या मनात बालपणाचं निर्मळपण टिकून राहतं, त्या मनात कधीच दुःख टिकत नाही. बालपण हे फक्त वय नसून, ती एक भावना आहे.



चेतन सामजवार, पांढरकवडा
मो. 99750 57703

# विनोदाचे अचूक टायमिंग साधणारा सर्वांचा लाडका लक्ष्या



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज जन्मदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म ७१ वर्षापुर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला जन्मदिनी विनम्र अभिवादन!










# पांडव पंचमी

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

ज्ञानाचा दिवस: पांडवांना पृथ्वीवरील राज्य क्षणभंगुर आहे आणि एके दिवशी या जगाचा निरोप घ्यावा लागेल हे ज्या दिवशी ज्ञान झाले, त्या दिवशी पांडव पंचमी होती. त्यामुळे याला ज्ञानपंचमी असेही म्हणतात.

संतती हवी असलेल्या स्त्रिया या दिवशी पाच शेणाच्या गोळ्यांच्या प्रतिकाची पांडव म्हणून पूजा करतात आणि त्यांना पांडवांसारखे चांगले बाळ व्हावे अशी प्रार्थना करतात.

नवीन सुरुवात: या दिवसाला लाभपंचमी असेही म्हटले जाते, कारण या दिवसापासून नवीन व्यवसायाची सुरुवात करणे शुभ मानले जाते.

व्यासकृत महाभारतानुसार, हस्तिनापुरच्या सिंहासनावरून कौरव व पांडवांमध्ये युद्ध झाले, हे सर्वज्ञात आहेच. त्यावेळी श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनाखाली पांडवांनी कौरवांशी लढाई केली. राहायला घर नाही, वडिलांचे छत्र नाही, पुरेसे मनुष्यबळ नाही. युद्धासाठी लागणारी दौलत नाही अशा परिस्थितीत सुद्धा कठोर परिश्रम करून त्यांनी हस्तिनापूरात आपले स्थान निर्माण केले.आपल्या गुणांच्या बळावर इंद्रप्रस्थाचे राज्य उभे केले. तसेच वनवासात व अज्ञातवासात जाऊन आल्यानंतर हस्तिनापूरसारख्या प्रतिष्ठित सिंहासनाला आव्हान करून सिंहासन जिंकून घेतले. भावांच्या विरुद्ध विचार आणि मतांचा आदर करत आपल्यातील एकजूट कायम ठेवली. आईचा प्रत्येक आदेश शिरोधार्य मानला. आपल्यावरील अन्यायाचे निराकरण केले. अशी गुणी व विजयी मुले आपल्यालाही व्हावीत म्हणून प्रत्येक आई पांडवपंचमीच्या दिवशी पांडवांची पूजा करून गुणी,



आज्ञाधारक व बलवान मुलांनी आपली कूस उजळावी अशी प्रार्थना करते.

पांडव पाच भाऊ होते ज्यांची नावे आहेत:- १. युधिष्ठिर, २. भीम, ३. अर्जुन, ४. नकुल आणि ५. सहदेव. हे पाच पांडव होते. युधिष्ठिर हा धर्मनिष्ठ आणि सत्यवादी योद्धा होता, भीम त्याच्या शारीरिक सामर्थ्यासाठी प्रसिद्ध होता, अर्जुन एक महान योद्धा आणि धनुर्धारी म्हणून जगप्रसिद्ध होता, नकुल एक निपुण घोडेस्वार, प्राणी तज्ञ आणि सहदेव तलवारबाजी आणि त्रिकालदर्शी होता. पंचमीला वातावरणात ईश्वराकडून येणारी पांडवांची आदर्श तत्त्वे आणि गुण अधिक प्रमाणात असतात. गायीच्या शेणामध्ये ती मोठ्या प्रमाणात आकर्षिली जातात. घरात पांडव पंचमीची पूजा केल्याने आदर्श तत्त्वे आणि गुण आपल्यात येण्यास साहाय्य होते.

गायीचे शेण सात्त्विक असून जिवाला लाभ होतो म्हणून या दिवशी गायीच्या शेणापासून पांडव सिद्ध करून त्यांची पूजा करतात या दिवशी श्रीकृष्णाचा नामजप करून अशी प्रार्थना केली जाते की 'हे कृष्णा, ज्याप्रमाणे तुझ्या आदेशानुसार पांडवांनी कौरवांच्या विरुद्ध युद्ध करून विजय मिळवला, त्याप्रमाणे आम्हाला गुरूंचे आज्ञापालन करून देवा तुझ्यासारखे गुण आमच्यात येण्याचे बळ दे. आमच्यावर सदैव तुझी कृपा असू दे. अशा प्रकारे पांडव पंचमीला भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

**सौ.सुनिता दिपक कावसनकर,**
कवयित्री/लेखिका/प्रकाशिका/संपादिका
युगंधरा प्रकाशन/युगंधरा साप्ताहिक
छत्रपती संभाजीनगर

# रज्जाक शेख यांच्या कवितेची ६९ व्या विदर्भ साहित्य संमेलनासाठी निवड

**ज्योतिर्मय साहित्य**

**श्रीरामपूर** –मराठी साहित्यिक मांदियाळी असणारे राष्ट्रीय पातळीवरील ६९ व्या विदर्भ साहित्य संमेलनासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील रहिवासी साहित्यिक, गजलकार, लेखक, कवी, रज्जाकभाई शेख यांच्या ''एकाच पावसाने'' या शेतकरी व कष्टकरी समाजातील माणसाच्या व्यथा मांडणाऱ्या कवितेला सादरीकरणाची संधी संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी निमंत्रितांच्या कविकट्ट्यावर मिळणार आहे. यासाठी निवड झाल्याचे संयोजन समितीच्या वतीने रज्जाक शेख यांना निवडपत्राद्वारे कळवण्यात आले आहे. विदर्भ साहित्य संघ आयोजित हे संमेलनाचे एकोण सत्तरावे वर्ष असून कवी रामानंद गडपायले साहित्यनगरी जांब तालुका यवतमाळ येथे जेष्ठ साहित्यिक रमाकांत कोलते यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १ आणि २ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेले आहे. सदरील पत्र संयोजक पंकज मारावार, मंगेश चौधरी यांनी पाठवलेले आहे. ग्रामीण साहित्यिक तथा गझलकार रज्जाक शेख यांनी जीवन गौरव शैक्षणिक मासिकाच्या माध्यमातून वाचनलेखन चळवळीत सक्रिय राहून काम केले आहे. त्यांच्या दोन हजारपेक्षा जास्त कविता विविध वृत्तपत्र, मासिके व दिवाळी विशेषांक यांत प्रकाशित झालेल्या आहेत.कथा व लेखनातूनही त्यांनी वाचकांना प्रेरणा दिली आहे. राज्यभरातून शेकडो काव्यसंमेलनात त्यांच्या कवितेची दखल घेतली गेली आहे. शालेय स्तरांवरील विविध नाटिका बसवून जिल्हा स्तरावर पारितोषिक मिळाले आहे. चालता बोलता काव्यात बोलू, चला पाहूया काव्य करून, माझं ऐका कला मंच, माझं गाणं, प्रेरणादायी गितमंच, असे विविध उपक्रम शाळेत राबविले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन अनेक सामाजिक संस्थेकडून राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. श्रीरामपूर तालुक्यातील खोकर नावाच्या एका छोट्याशा खेड्यात जन्म झालेल्या राज्जाक शेख यांना लहानपणापासून गाण्याचे व लिखाणाचे वेड. आतापर्यंत लातूर येथे ज्ञानतीर्थ पुरस्कार, नागपूरहून डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन गुणवंत



शिक्षक पुरस्कार, पुण्यातून संत एकनाथ स्मृतिगौरव पुरस्कार, अहमदनगर हून ध्येय आदर्श शिक्षक पुरस्कार, शिर्डीचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, ठाण्याहून प्रेरणा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार यासारखे विविध सामाजिक संस्थाकडून वीस शिक्षक पुरस्कार आतापर्यंत मिळाले आहेत. शिक्षणाचा वारसा चालवताना मनातील भावनांना शब्दबद्ध करून कविता, कथा, लेख यांचे लेखन तसेच हास्यकविता, लेख, हायकू, अभंग, प्रेमकविता, गझल, काव्यांजली, अष्टक्षरी, गजल आदी काव्यप्रकारात लेखन केले आहे. आतापर्यंत अनेक वृत्तपत्रे व दिवाळी अंकातून कविता, कथा, लेख व गझल यांना प्रसिद्धी मिळाली आहे. प्रवरा कम्युनिटी रेडिओ नभोवाणीवर व्याख्यान, कविता व मुलाखतीचे प्रसारण झालेले आहे. त्यांच्या कवितांना युट्युब, एसीबीएन न्युज, सी९ न्युज, अहमदनगर महानगर न्युज, पारनेर टाइम्स, भारतीय जनमत पुणे आदी टेलिव्हिजन चॅनेलवर कविता व कार्यक्रम सादरीकरण केले आहे. वर्डसामना, शब्दरसिक, क्रांतिसूर्य, लक्ष्मीपुत्र, गोंदण, ग्रामसेवा, आसमंत काव्यप्रेमीचे, भगवानबाबा आदी दिवाळी अंकात तसेच त्यांच्या दर्जेदार कविता प्रतिलिपी, स्टोरीमिरर, लागीर झालं या ॲपवर सापडतात. ते जीवन गौरव शैक्षणिक मासिक सहसंपादक, शब्दविद्या दिवाळी अंक उपसंपादक, काव्यदरबार बालकाव्य विशेषांक संपादक या पदावर ते साहीत्य चळवळीचे काम पाहतात. त्यांनी आतापर्यंत तीनशेच्या वर कविसमेलनाच्या मंचावर कवितांचे सादरीकरण केले आहे. आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन गुजरात,अखिल भारतीय साहित्य संमेलन उस्मानाबाद, नाशिक, उदगीर, आखिल भारतीय मुस्लिम साहित्य संमेलन पुणे येथे त्यांच्या कवितांची निवड झाली आहे. काव्यक्षेत्रातील यशाबद्दल त्यांचा आतापर्यंत पंच्याहत्तर वेळा व्यासपीठावर गौरव करण्यात आला आहे. लहान मुलांना कवितांची मेजवानी देण्यासाठी ''काव्यदरबार'' या बाल दिवाळी अंकाचे संपादन केले आहे. आपल्या उत्तम लेखणीद्वारे राज्यातील विविध वर्तमानपत्रातून कोरोना जागृती करण्यासाठी आपल्या तीस ते पस्तीस कवितांना प्रकाशित करून आरोग्य व कोरोना यांच्या भयंकरतेची कल्पना मांडली. राज्यातील विविध वृत्तपत्रातून ''खेळू करू शिकू'' या शासकीय पुस्तकाचे समीक्षण करून लेखाद्वारे सर्व राज्यभर प्रसिद्धी दिली. सध्या शाळा बंद काळात विद्यार्थ्यांना मनोरंजक अशा राज्यभरातून गाजलेल्या नामवंत शंभर कवींच्या बालकविता एकत्र करून सर्व विद्यार्थ्यांना मोफत काव्यदरबार हा दिवाळी बालकाव्य विशेषांक उपलब्ध करून दिलाआहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

***



# ''फिर से पलट के''

**ज्योतिर्मय साहित्य**

देखा है मैने तुम्हे फिर से पलट के! तुम मे है बात कोई औरोंसे हटके!

काम करत असताना, हे गाणं आकाशवाणीवर लागलं. कधी ऐकलं आणि कधी सहज ओठावर आलं ते कळलंही नाही. गाणं म्हणत असताना मी शब्दांच्या अर्थाकडं मागे वळून (पलटके) पाहिलं.

कवितेतल्या नायकानं नायिकेला पहिल्यांदा जाता जाता पाहिलं होतं आणि मग पलटून पाहिलं तेव्हा तिच्यातलं खासपण जाणवलं.

आयुष्यात अशा कित्येक व्यक्ती, घटना, गोष्टी, विचार यांच्याकडे आपण काही वेळेला पलटून पाहतो. हे पलटून पाहणं म्हणजे पुन्हा एकदा मागे पाहिलेल्याचं नव्यानं पूर्णतः ज्ञान घेण्याचा प्रयत्न करणं. नव्याने काही उलगडे होतात का हे पाहणं.



सौ.नीलिमा मकरंद बोकील, पुणे
मो. 94204 95478

पलटके पाहण्यामुळे कित्येकदा ''फर्स्ट इम्प्रेशन इज लास्ट इम्प्रेशन'' ही इंग्रजी म्हण थेट मोडीत निघालेली आहे. पहिल्यांदा भांडण होणाऱ्या व्यक्ती एकमेकासोबत आयुष्यभराची गाठही बांधून घेतात. कां तर त्यांनी ''फिरसे पलटके'' बघितलेलं असतं.कित्येकदा दुसऱ्याचे आपल्यासोबतचे वर्तन चुकीचे वाटू शकते. पण तीच गोष्ट कालांतराने मागे वळून पाहिल्यानंतर ते वर्तन अत्यंत योग्य होते असे वाटते. जसं की तरुण वयात पालकांनी केलेल्या सूचना चुकीच्या वाटतात. पण आपण पालक झाल्यावर ''फिरसे पलटके देखा'' तर योग्य वाटू लागतात.

तसचं आपल्यासोबत घडलेल्या घटनांबाबतीत, निसर्गाचा न्याय हा काही काळापुरता अन्याय वाटू शकतो.पण तेच न्यायी होतं हे मागे वळून पाहिल्यावर कळतं.

असा परस्परविरोधीपणाचा अनुभव येतो.

पुन्हा मागे वळून पाहणं म्हणजे मनाची कवाडं थोडी खुली झालेली असतात.काही नविन स्विकारण्याची तयारी असते आणि मग खरंच नवं पदरात पडतंही! जुन्यातून नवी ऊर्जा !

पण ज्यानं मनाची कवाडं बंद केली आहेत. त्याला हे फिरसे पलटून पाहणं जमत नाही.मग त्याचं मत हे ठाम बनून जातं. आणि नाविन्यतेचं खातं त्याच्यासाठी बंद होतं!

म्हणून ऊर्जावान राहण्यासाठी ''फिरसे पलटके देखो'' हा एक मंत्रच आहे.मग ते आपल्या वर्षानुवर्ष बाळगलेल्या विचारधारा, संस्कृती तसंच तत्त्वांच्या बाबतीतही असू शकतं!

आणि मग स्वतःचं काय? आपणही जुनेच असतो की! म्हणून आत्मपरीक्षणासाठी मी माझ्याकडेच वळुन पहायचं ठरवलं. आणि काय सांगू?मी पण मला नव्यानं सापडू लागले. आता माझं नवं गाणं मी गाते.....

देखा है मैने मुझे, फिर से पलटके! मुझमें है बात कोई और से हटके!....।





# खासदार डॉक्टर भागवत कराड यांच्या प्रयत्नांना यश

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : रस्ते व वाहतूक मंत्री माननीय नितीनजी गडकरी यांनी चाळीसगाव कन्नड संभाजीनगर या मार्गावरील आऊट्रम घाटा करता २ हजार ४३२ कोटी रुपये मंजूर केलेत.

या निमित्ताने मराठवाडा रेल्वे कृती समिती तर्फे डॉक्टर भागवत यांचा सत्कार श्री अनंत बोरकर व श्री प्रल्हाद पारटकर यांच्या हस्ते करण्यात आला.

चाळीसगाव कन्नड संभाजीनगर उद्या रेल्वेच्या कामाचा डीपीआर येत्या दोन महिन्यात मंजूर होणार आहे. त्याचे काम स्वतंत्रपणे रेल्वे विभाग करणार आहे. या संदर्भातील मीटिंग रेल्वे बोर्डामध्ये रेल्वे बोर्ड चेअरमन व अध्यक्ष

सतीश कुमार व सहआयुक्त कृष्णकांत

व आयुक्त अभिषेक जगवत मागील आठवड्यात झाली यामध्ये चाळीसगाव कन्नड संभाजीनगर तसेच अहिल्यानगर ते संभाजीनगर या दोन्ही रेल्वे प्रकल्पाच्या संदर्भात चर्चा झाली व रेल्वे बोर्डाने मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांना डीपीआर लवकर सादर करण्याचे निर्देश दिलेत. येत्या मंगळवारी खासदार डॉक्टर भागवत कराड हे स्टेशन वरील छत्रपती संभाजीनगर या अधिकृतपणे जाहीर झालेल्या नाम फलकाचे अनावरण करणार आहेत अशी माहिती मराठवाडा रेल्वे कृती समितीतर्फे श्री अनंत बोरकर यांनी दिली.

# आशीर्वाद देणाऱ्या वेली...

**ज्योतिर्मय साहित्य**

माझं टुमदार घर झाडावेलींनी वेढलेलं. फाटकाजवळ येताच पारिजातक, जाई, मोगरा आणि बकुळगंधानं वेड लागतं. दोन्ही बाजूंनी ताम्हिणीची झाडं फुलांनी डवरलेली, अंगणात शिरताच सोनचाफा सुगंधानं स्वागत करतो, झब्बा जास्वंद, बहावा, अंजीर, तगर, रायावळा, करकम, हिरवा चाफा, बेल जांभूळ, सीतेची वेणी असं साम्राज्य पसरलेलं. पण गेल्या चारपाच महिन्यात गडबड असल्याने बागेकडे बघायला वेळ मिळाला नव्हता की परसदार साधं उघडलंही नव्हतं त्यातच हा पाऊस.





परिणामी बागेतल्या प्रत्येक झाडावर कोणता ना कोणता रोग पसरला होता. मावा, चिकटा, गोगलगायी, अळ्या.. विचारु नका.

या दोन दिवसांत थोडी धावपळ कमी झाली आणि या साथीच्या रोगांकडे लक्ष गेलं. फाटकावर अनेक वेलींची गुंतागुंत झालेली. पण त्या वेलीही आजारी पडलेल्या..

शेवटी आज कटर घेऊन माळीमामा आलेच. घर्रर घर्रर घर्रर आवाज करत त्यांनी कोरडेठाकपणे सगळी छाटाछाटी केली. दुपारी बारा एकच्या सुमारास आलेल्या मामांनी काम संपवायला तिन्हीसांज गाठली.

या वेळेला कातरवेळ का म्हणतात, याचा प्रत्यय मला असाही रोजच येतो आणि ही वेळ मला छळतेच. त्यात आज पानाफुलांनी बहरलेलं अंगण भकास दिसू लागलेलं..



सविता कारंजकर
(मो)९९२२८१४१८३

कापलेल्या झाडांच्या लाकडाच्या मोळ्या मामांनी इतक्या सुंदर पद्धतीने मांडल्या होत्या की ती नक्षी बघत बसावी. पण त्या मोळ्यांच्या जागी मला माझे अवयव दिसू लागले. अस्वस्थता आली. कामही संपलं. शरीर तर थकलं होतंच, पण या उदास चित्राकडे पाहून आता मेंदूही शिणला. घरात आले. आलेला शिणवटा घालवावा म्हणून गाणी लावण्यासाठी सारेगामा कारवाँचं बटण दाबलं. आरामखुर्चीत देह झोकून दिला. डोळे मिटले आणि काही दिवसांतच भुंड्या झाडांवर कोवळी लुसलुशीत पालवी फुटेल, या विचारावर लक्ष केंद्रित केलं आणि तेवढ्यात गुडघाभर साठलेल्या चिखलापाण्यात उभा राहून भुईसपाट झालेल्या पिकांकडे पाहून धाय मोकलून रडणारा बळीराजा आठवला. खाडकन् डोळे उघडले. मेंदूला झिणझिण्या आल्या. माझी झाडं पुन्हा काही दिवसातच पानाफुलांनी डवरणार आहेत, हे माहित असूनही त्यांना असं भुंडं पाहून झालेलं दुःख मला कस्पटासमान भासू लागलं. बळीराजाचं पीक तर त्याचं अपत्यच. कसं सोसलं असेल त्यानं हे मरण?

संकट मानवनिर्मित असो किंवा निसर्गनिर्मित, नुकसानीचा फटका बसतो तो या जगाच्या पोशिंद्यालाच. मन आक्रंदू लागलं..घेरी येतीय की काय असं वाटू लागलं तितक्यात कृष्णा आला आणि जवळजवळ ओरडलाच, ''आई, डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद देणा–या वेली कुठं गेल्या?हे आपलंच घरै का?

मी हतबुद्ध,निःशब्द!

# संगीतातील महासागर– पं.हृदयनाथ मंगेशकर

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

त्यांचा गुढ, चिरंतन, गहीरा, स्थीर, स्वभाव त्यांच्या संगीतात दिसतो. कसा हे उदाहरणादाखल बघू. त्यांच्या कोणत्याही गाण्याची सुरुवात पुन्हा पुन्हा लक्ष देऊन ऐका. पहिलाच स्वर आपल्या काळजाचा ठाव घेतो. सुन्या सुन्या, काजल रातीन , चांदण्यात फिरताना, लवलव करी, केंव्हा तरी, गुणी बाळ, उषःकाल होता, आम्ही ठाकर, होनभ उतरु अशी सगळीच गाणी जाणीवपूर्वक लक्ष देऊन पुन्हा पुन्हा ऐका. लक्षात येईल की सुरुवातीचा पहिला स्वर लक्षवेधी हृदय भेदी आहे. कोणतंही गाणं केवळ मोजक्या चार स्वरांत खेळतच नाही. किमान दोन ते तीन सप्तकात त्यांचं गाणं खेळतं. अनवट खेळ करतानाही त्यांचे स्वर गायकास स्वरांवरील ठहराव शिकवतात. ठहराव जो अभिजात शास्त्रीय गायकीत महत्वपूर्ण मानला जातो, तोच ठहराव हृदयनाथांच्या संगीताचा आत्मा आहे. स्वरांवरील गहरी पकड आवश्यक आहे कारण त्यांच्या संगीतात सुक्ष्म श्रुतींचा लगाव असतो . प्रत्येक स्वर कसून जाणवून अंतरंगात भिनवून गायला तरच त्यांचं गाणं गायकाच्या गळी उतरु शकतं. ती स्वररचना वरवर गायची हलकी फुलकी नाहीच. त्यामुळे ध्यानस्थ होऊन, स्वरांचे चिंतन करुन गाणारे गायकच त्यांच्या गाण्यांना न्याय देऊ शकतात.

पंडितजींचे व्यक्तीमत्व उलगडतांना नेमकं कशाबद्दल लिहावं ? कारण ज्यांच्यामुळे महाराष्ट्रास ज्ञानेश्वर कळले, भगवद्गीता मुखोद्गत झाली, छत्रपती शिवराय समजले, देवांच्या आरत्या, पसायदान, भुपाळी, गणपतीची गीते काय लिहावे आणि काय सोडावे ? कवी कळले, कवी प्रसिद्ध झाले, चित्रपट दिग्दर्शकांस नावलौकिक मिळाले, शायर उमगले. सूर्य जसा उगवल्यावर केवळ स्वतःच्या अस्तित्वातील ओजाने पृथ्वीवर चैतन्य निर्माण करतो तसे मंगेशकर आहेत. पंडितजी म्हणजे परीस आहेत. ते ज्यांच्या आयुष्यात आले त्यांच्या आयुष्याचे सोने झाले. कवी ग्रेस यांच्या गुढ कवितांची त्यांनी गीते बनवली. ना. धो. महानोर, आरती प्रभुंना गीतकार म्हणून प्रकाश झोतात आणले. त्यांच्यापेक्षा बावीस वर्षांनी थोर असलेल्या शांताबाईंकडून वेगळ्या धाटणीची गाणी लिहून घेतली. स्वातंत्र्यवीर सावरकरांकडून वयाच्या पंधराव्या वर्षीच कविता निवडून द्या म्हणण्याचे धाडस करून कविता मिळविली, संगीतबद्ध केली आणि गाजवली. संत मीराबाई, कबीर, रोहीदास , सुरदास , तुलसीदास असे उत्तरेकडले संतकवी, तसेच स्वतः उर्दू शिकून शायर मिर्ज़ा ग़ालिब यांच्या दर्जेदार उर्दू रचनांना स्वरसाज चढवून सोन्याची झळाळी दिली. बंगाली, कोकणी, कोळी गीतांचा वेगळाच फ्लेवर जगास दाखवला. अनुवांशिक जे मिळाले ते त्यांनी सगळं बदलून टाकलं. नाट्यगीत, बंदीशी नव्या रुपात नवीन स्वरसाजासह सजवल्या, लोकप्रिय केल्या. वारसा जतन केला. हे सगळं करता करताच यशस्वी संसार केला, नाती सांभाळली, भावाची कर्तव्य पार पाडली, पती–पिता म्हणून सगळी कर्तव्य पार पाडली. कुटुंबासाठी व्यवसाय सुरु केले. चालवले आजही चालवत आहेत. हे सगळं त्यांनी एका दुखऱ्या पायाची वेदना





"लक्ष्मीमंगेश"
सौ.विजयालक्ष्मी मणेरीकर.
नाशिक. ९८२२६८३७९९

आयुष्यभर सहन करत केलं. लतादीदी गेल्यानंतर दोन वर्षांपूर्वी पंच्याऐंशीव्या वर्षी त्यांचे मणक्याचे ऑपरेशन झाले आणि ऑपरेशन नंतर काहीच महिन्यात ते विविध शहरांत मैफिली करत मंचावर दिसू लागले. सारं काही अभिजात'', दीदी आणि मी असे कार्यक्रम ते स्वतः फार आजारी असतांनाही अधिक जोमाने करु लागले. मी कधी त्यांची प्रकृती स्वास्थ्याबाबत चौकशी केली तर सांगतात, ''माझी काळजी करु नकोस मी फिनिक्स पक्षी आहे. '' ही थक्क करणारी आत्मशक्ती कुठून येत असावी ?

एका आयुष्यात माणूस किती कार्य करु शकतो ? याचे काही मोजमाप नाहीच. अमर्याद आत्मशक्ती निर्माण करुन अपंगत्वावर मात करून सतत उर्जान्वित होऊन काम करत राहणे म्हणजे पं. हृदयनाथजी. कलात्मक निर्मिती आणि व्यवसाय निर्मिती यांची तुलना होऊच शकत नाही पण म्हणून गाण्यांचे उत्तुंग प्रदेश निर्माण करणाऱ्या पंडितजींनी सर्व सोयींनी उपयुक्त अवाढव्य हॉस्पीटलची निर्मिती केली, त्यातून समाजसेवा, रोजगार निर्मिती, व्यवसाय निर्मिती केली त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. चित्रपट निर्माण केले. भावसरगम, मैत्र जीवांचे, शिवकल्याण राजा, अमृताचा घनु, भावार्थ माऊलीसारखे कार्यक्रम निर्माण केले. त्यातून त्यांनी रसिकांची अभिरुची उच्चतम केली. वयाच्या आठव्या वर्षी कार्यक्षेत्रात पाऊल ठेवले ते आजतागायत सातत्यपूर्ण आठ दशके ते अखंड अविश्रांत कार्य करत आहेत. घरातील त्यांच्या पेक्षा वयाने मोठ्या असलेल्या अतिशय यशस्वी बहिणींच्या ( भारतरत्न लता मंगेशकर आणि स्वरस्वामिनी आशा भोसले ) दिव्य प्रकाशात जळून न जाता, उलट स्वतःच्याही तेजांकित आभेच्या वलयांकित कोंदणात बहिंणींना सदैव स्वरसाथ दिली, त्यामुळेच पंचस्वररत्नजडीत जवाहीर या





देशास लाभले. हे सर्व केवळ अतर्क्य वाटते. दैवी अंश त्यांच्यात असल्याशिवाय इतकी अफाट कार्यशक्ती, अद्भूत कला निर्मिती शक्य नाही. अशा थोर संगीतकारास त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्रिवार अभिवादन.

जिवेत शरद शतम !

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559